दि. ११ सप्टेंबर २०१८

प्रति,
प्राचार्य/विभागप्रमुख,
...............................................यांना

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने राबविण्यात येत असलेली 'संविधान दूत' ही महत्त्वाकांक्षी योजना शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासुन सुरू करण्यात आली आहे. अशा प्रकारची योजना राबविणारे शिवाजी विद्यापीठ हे भारतातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. मा. कुलगुरूंनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आपण ही योजना प्रत्येक महाविद्यालयमध्ये राबवावयाची आहे.

'संविधान दूत' योजनेची माहिती व अर्ज विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आला आहे. तो पूर्ण माहितीसह भरून खालील पत्त्यावर पाठवावा–

संचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर– ४१६००४

आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षकांची मिटींग घेऊन या योजनेची माहिती देण्यात यावी आणि त्यानंतर महाविद्यालयाने निवडलेला / निवडलेले 'संविधान दूत' यांचे अर्ज प्राचार्यांनी उपरोक्त पत्यावर अग्रेशित करावेत ही विनंती.

आपला विश्वासू,
Mahajan

संचालक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

संविधान दूत योजना अर्ज

१) संपूर्ण नाव :

२) घरचा पत्ता :

३) महाविद्यालयाचे नाव फोन नं व पत्ता :

४) ई– मेल :

५) मोबाईल नं :

६) विषय :

७) पद:

८) वय:

९) जन्मतारीख :

१०) शिक्षण :

११) प्रवर्ग :

१२) धर्म :

१३) ग्रामीण / शहरी

मी स्वत: ही माहिती दिली असून ती खरी आहे. स्वेच्छेने मी या योजनेत सहभागी होऊ इच्छितो.

अर्जदाराची सही

संविधान दूत ही विद्यापीठाची महत्वकांक्षी योजना आमच्या महाविद्यालयात राबविणार आहोत. उपरोक्त शिक्षक हे आमच्या महाविद्यालयात कार्यरत आहेत. त्यांना महाविद्यालयाच्यावतीने या योजनेत सहभागी करून घेण्यात यावे ही विनंती.

प्राचार्य

**आपल्या सर्वांचा सन्मान आपले भारतीय संविधान**

# संविधानदूत योजनेचा प्रस्ताव
## ( शिवाजी विद्यापीठाचे महत्वाकांक्षी अभियान )

**प्रस्तावक:**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर.**

**योजनेचे क्षेत्र:**

**शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र**

**प्रस्तावना:**

विद्यार्थी हे देशाचे भावी नागरिक सक्षम व प्रगल्भ व्हावेत आणि विद्यापीठाचे कार्य शिक्षणाच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचावे हे विद्यापीठाने आपले कर्तव्य समजले आहे. त्याअनुषंगाने स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता इत्यादी उदात्त मानवीमूल्ये रूजविण्यासाठी आणि समाजामध्ये भारतीय संविधानाबद्दल जागृती करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे हे केंद्र 'संविधानदूत' ही महत्वकांक्षी योजना राबवित आहे.

**प्रकल्पाची उध्दीष्टे :**

१) भारतीय संविधानाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करणे.
२) विद्यार्थी व शिक्षकांनी ती जागृती समाजामध्ये करणे.
३) मानवी हक्क व मानवी मूल्यांप्रती जागृती निर्माण करणे.
४) स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय आणि धर्मनिरपेक्षता इत्यादी उदात्त मानवीमूल्ये रूजविण्यासाठी प्रयत्न करणे.

**कार्यवाही :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम विद्यार्थी, शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी सदर केंद्राचे महाविद्यालयातील प्रतिनिधी म्हणून 'संविधानदूत' कार्य करतील.

२) संबधित महाविद्यालयाचे प्राचार्य महाविद्यालयातील किमान एका शिक्षकाची 'संविधानदूत' म्हणून निवड करतील व त्याचे नाव विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राला कळवतील. सर्व महाविद्यालयामध्ये प्रत्येकी किमान एक 'संविधानदूत' कार्यरत असेल.

३) सदर केंद्र राबविणार असलेल्या उपक्रमांचा व संविधानाचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य हे 'संविधानदूत' करतील.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र व संलग्न महाविद्यालय एकत्र येऊन या केंद्राच्या उद्दिष्ठानूसार जागृती कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयात किंवा केंद्रात करतील. या कार्यक्रमांमध्ये व्याख्याने, चर्चासत्रे, कार्यशाळा, प्रशिक्षण वर्ग इत्यादींचा समावेश असेल. यासाठी संविधानदूत दुवा म्हणून कार्य करेल.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र व संलग्न महाविद्यालय एकत्र येऊन या केंद्राच्या उध्दीष्ठानुसार संशोधन कार्य हाती घेतले जाईल. त्यामध्ये महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, व इतर समाज घटक आवश्यकतेप्रमाणे सहभागी होतील. यासाठी संविधानदूत दुवा म्हणून कार्य करले.